# साथ

दूर गेल्या चांदण्या, रात्र श्वासात वाहिली
वर्षल्या तारा प्रकाशी, स्वप्नात रात्र जागली

असे स्पंदनांची जाळी, स्तब्ध आभास भोवती
तुझ्यात साठलो मी, सावल्याही श्वास घेती

भाळले क्षितिज रात्री, अलिप्त राहुन सोबती
त्याच्या मनीचे गुज, विरघळे शांत निशेतूनी

फुटले अंकुर मानसी, चांदण्यात सोन पालवी
हात सोडवेना सखी, पाऊले जड झाली

www.saarthbodh.com
©सपु , सचिन पु. कुलकर्णी